.. Tukarama Arati ..

॥ आरती तुकारामाची ॥

प्रपञ्चरचना सर्वहि भोगूनि त्यागिली ।
अनुतापाचे ज्वाळी देहबुद्धि हरविली ॥
वैराग्याची निष्ठा प्रगटुनि दाखविली ।
अहंममता दवडुनि निजशान्ती वरिली ॥ १ ॥

जय जयाजी सद्गुरु तुकया दातारा ।
तारक तू सकळांचा जिवलग सोयरा ॥ धृ ॥

हरिभक्तीचा महिमा विशेष वाढविला ।
विरक्त ज्ञानाचा ठेवा उघडुनि दाखविला ॥
जगदुद्धारालागीं उपाय सुचविला ।
निंदक दुर्जनाचा संदेह निरसीला ॥ धृ ॥ २ ॥

तेरा दिवस वह्या रक्षुनियां उदकीं ।
कोरड्याचि काढुनि दाखविल्या शेखी ॥
अपार कविताशक्ति मिणवुनि इहलोकीं ।
कीर्तन श्रवणें तुमच्या उद्धरति जन लोकीं ॥ धृ ॥ ३ ॥

बाळवे घेऊनि श्रीहरी भेटला ।
विधि जनिता तोचि आठव हा दीधला ॥
तेणें ब्रह्मानन्दे प्रेमा डोलविला ।
न तुके म्हणोनि तुका नामीं गौरविला ॥ धृ ॥ ४ ॥

प्रयाणकाळीं देवें विमान पाठविलें ।
कळिच्या काळामाजी अद्भुत वर्तविलें ॥
मानव देह घेऊनि निजधामा गेले ।
निळा म्हणे सकळ संत तोषविले ॥ धृ ॥ ५ ॥

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated February 16, 1999